# प्रकरण - १

## मराठीतील आत्मचरित्रात्मक लेखन व ' स्मृतिचित्रे '

## प्रकरण - १

## मराठीतील आत्मचरित्रात्मक लेखन व ` स्मृतिचित्रे `

### पुरुषांचे आत्मचरित्रपर लेखन

` स्मृतिचित्रां ` चा अेक आत्मचरित्र म्हणून अभ्यास करताना ` स्मृतिचित्रां ` पूर्वी प्रकाशित झालेल्या व ` स्मृतिचित्रा ` नंतर साधारणपणे १९५० पर्यंतच्या कालखंडात लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांचा अेक स्थूलस्वरुपाचा आढावा घेअून त्यांच्या पार्श्वभूमीवर ` स्मृतिचित्रां ` ची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे योग्य ठरेल.

मराठीतील आत्मचरित्र वाङ्मयाकडे नजर टाकली असता हे दालन संख्येच्या दृष्टीने विशेष संपन्न नाही, ही गोष्ट सहज लक्षात येते. आत्मचरित्र-लेखनाची कला अिंग्रजी अमदानीत विकसित झाली. त्यापूर्वी प्राचीन मराठी कवी पैकी नामदेव, तुकाराम, जनाबाअी, बहिणाबाअी यांच्या अभंगात आत्मनिवेदन आलेले आढळते. पेशवाअीच्या काळात नाना फडणविसांनी आपले आत्मचरित्र लिहून ठेवले आहे. ` आत्यंतिक धर्मभावना आणि प्रखर कामभावना यांच्या कोंडीत सापडलेल्या आपल्या व्यक्तिमत्वाची कोंडी पेशव्यांच्या आपल्याबद्दलच्या लोभामुळे कशी फुटली आणि परिणामी आपण राजकारणाकडे कसे जुंपलो गेलो, याबद्दलचे हे निर्भीड आत्मनिवेदन आहे आणि आत्मपरीक्षणही आहे `[१] असे मत श्री. भीमराव कुलकर्णी यांनी या आत्मचरित्राबद्दल व्यक्त केले आहे. तथापि हे आत्मचरित्र अत्यंत संक्षिप्त व त्रोटक आहे. बडोद्याचे गंगाधर कृष्णशास्त्री पटवर्धन यांनीही

आत्मपर लेखन केले आहे. १८५९ मध्ये विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी 'वेदोक्त धर्मप्रकाश' हा ग्रंथ प्रसिध्द केला, त्यात आत्मचरित्रलेखनाच्या खुणा आढळतात. सुप्रसिध्द क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके याचे आत्मचरित्र १८७९ मध्ये ज्ञानप्रकाशात प्रसिध्द झाले. त्यात त्यांनी आपली कैफियत मांडली आहे. तथापि वरील सर्व ग्रंथांचा समावेश आत्मचरित्र या प्रकारात करणे धाडसाचे ठरेल.

मराठीतील पहिला आत्मचरित्रात्मक ग्रंथ म्हणून आद्य मराठी व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांच्या 'आत्मचरित्र' या ग्रंथाचा उल्लेख केला पाहिजे. स्वत: ठेवलेल्या दैनंदिनीच्या आधारे त्यांनी आपल्या बालपणापासून ते १९४८ पर्यंतची हकीकत यात सांगितली आहे, व पुढे १८८२ मध्ये स्वत:चा मृत्यू होईपर्यंत या ग्रंथात त्यांनी थोडी थोडी भर टाकली आहे. अव्वल इंग्रजी अमदानीतील समाजस्थितीचे दर्शन या ग्रंथात घडते. हा ग्रंथ महाराष्ट्रात प्रथम ज्ञात करून देणारे श्री. पांगारकर म्हणतात, "१९२० पासून १९७० पर्यंतच्या महाराष्ट्र समाजाचा, महाराष्ट्रीय विद्वानांचा, मराठी गद्याच्या वाढत्या काळाचा मनोरंजक इतिहास या आत्मचरित्रावरून दिसून येतो." [२] दादोबांचे समकालीन बाबा पद्मनजी यांनी लिहिलेले 'अरुणोदय' (१८८७) हे आत्मचरित्र त्यांच्या ख्रिस्तीकरणाचा इतिहास सांगते. त्यांनी आपल्या आत्मचरित्रलेखनासाठी पत्रे, दैनंदिनी, वृत्तपत्रातील उतारे इ. साधनांचा उपयोग केला आहे. तत्कालीन समाजजीवनातील संघर्षाचे सुंदर चित्र त्यांनी आपल्या आत्मचरित्रात रेखाटले आहे. त्यांच्या आत्मनिवेदनातील समतोल वृत्तीचा व प्रांजलपणाचा वाचकांच्या मनावर प्रभाव पडतो.

'अरुणोदया' नंतरचे उल्लेखनीय आत्मचरित्र म्हणून एका उत्कृष्ट भाषांतराचा उल्लेख करावा लागेल व तो म्हणजे वि.दा. सावरकर यांनी प्रसिध्द इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी याच्या आत्मचरित्राचा केलेला अनुवाद होय.

१९०७ मध्ये प्रकाशित झालेल्या या ग्रंथाव्दारे इंग्रजांच्या दडपशाहीविरुध्दच्या तीव्र भावनांचा आविष्कार करण्याचे व तरुणांना राष्ट्रभक्तीचा संदेश देण्याचे महत्वाचे कार्य सावरकरांनी केले आहे.

विसाव्या शतकाच्या आरंभी फारच कमी आत्मचरित्रे लिहिली गेली. थोर समाजसेवक व स्त्री-शिक्षणाचे पुरस्कर्ते महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी आपल्या जीवनापासून विद्यार्थ्यांनी बोध घ्यावा व आपण स्त्रियांच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याची लोकांना माहिती व्हावी या उद्देशाने `आत्मवृत्त `(१९१५) लिहिले. कठोर आत्मपरीक्षण हा आत्मचरित्रकाराला आवश्यक असणारा गुण महर्षी कर्वेंच्या ठायी आढळतो, म्हणून त्यांचे आत्मचरित्र दर्जेदार ठरले आहे.

या कालखंडात महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात प्रचंड उलथापालथ चालली असताना देखील तो काळ गाजविणाऱ्या टिळक, गोखले आदी समाजधुरीणांनी स्वत:ची आत्मचरित्रे मात्र लिहिली नाहीत. तथापि वि.दा. सावरकर यांनी मात्र सरकारच्या रोषाची पर्वा न करता अंदमान येथील त्यांच्या कारावासाची कहाणी `माझी जन्मठेप ` ( १९२७ ) च्या रुपाने जनतेपुढे ठेवली आहे. इंग्रज सरकारने या पुस्तकावर बंदी घातली होती. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारकांनी इंग्रजी सत्तेविरुध्द दिलेला लढा जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे. म्हणूनच याला राष्ट्रीय व वाड्.मयीन असे दुहेरी महत्व प्राप्त झाले आहे.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचा `चरित्रचंद्र `(१९३८) व नरसिंह चिंतामण केळकर कृत `गतगोष्टी ` ( १९३९ ) हे या कालखंडातील दोन महत्वाचे आत्मचरित्र ग्रंथ होत. पांगारकरांनी बोधवादी दृष्टिकोणातून आपल्या आत्मचरित्राचे लेखन केले आहे. वाड्.मयनिर्मिती करु इच्छिणाऱ्या लेखकांना ,

धर्मकार्य करू इच्छिणाऱ्या वक्त्यांना व संसार सुखमय करू इच्छिणाऱ्या प्रापंचिकांना व परमार्थाची इच्छा बाळगणाऱ्या मुमुक्षूंना आपल्या चरित्रापासून काहीतरी बोध मिळावा, असा या ग्रंथलेखनामागे पांगारकरांचा हेतू आहे. आत्मसंतोष व आत्मगौरव या दोन गुणवैशिष्ट्यांचा आढळ त्यांच्या आत्मचरित्रात होतो. त्यांची श्रध्दाळू वृत्तीही त्यांच्या लेखनातून दृग्गोचर होते. अत्यंत रसाळ व प्रेमळ निवेदन शैलीत लिहिलेले अेका मुमुक्षूचे आकर्षक असे हे आत्मचरित्र आहे.

केळकरांनी 'गतगोष्टी' च्या प्रस्तावनेत आत्मचरित्र लेखनामागील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आपल्या जीवनाचा वृत्तान्त जनतेसमोर सादर करावा व मनाला विरंगुळा वाटावा म्हणून जुन्या आठवणीत रमावे हा त्यांच्या आत्मचरित्रलेखनामागील हेतू आहे. आपल्या गुणदोषांचे त्यांनी तटस्थपणे दर्शन घडविले आहे. तथापि आपल्या राजकीय जीवनाचे दर्शन घडविताना मात्र ते आत्मसमर्थन करू लागतात. केळकरांच्या निर्मळ व प्रासादिक भाषाशैलीचा आविष्कार त्यांच्या या मनोवेधक आत्मचरित्रात आढळतो.

सुप्रसिध्द विनोदी लेखक व नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी १९३५ साली आपले 'आत्मवृत्त' लिहिले. अुपयुक्ततावादी दृष्टिकोणातून लिहिलेल्या या आत्मचरित्रात क्वचित आत्मश्लाघेचा दोष आढळला तरी कठोर आत्मपरीक्षणही आले आहे. कोल्हटकरांच्या नाट्यनिर्मितीचे रहस्य व पार्श्वभूमीही त्यांच्या या आत्मवृत्तातून कळते. या आत्मवृत्ताच्या लेखनसमाप्तीनंतर जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटल्याचा आनंद त्यांना झाला आहे.

सी.ग. देवधर यांनी आपल्या 'जीवनवृत्तान्ता' त (१९३७) प्रतिकूल परिस्थितीत बी.अे. पर्यंतची विद्या आपण कशी संपादन केली, हे सांगितले आहे. टिळक-आगरकर संबंधावरही त्यांच्या आत्मचरित्रातून प्रकाश पडतो.

गो.स. टेंबे यांचा 'माझा जीवनविहार' (१९४८) व ग.गा.बोडसांचे

` माझी भूमिका ` (१९४०) ही या कालखंडातील कलावंतांनी लिहिलेली आत्मचरित्रे होत. यात त्यांनी आपल्या कलाजीवनातील आठवणी सांगितल्या आहेत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ` माझ्या आठवणी व अनुभव ` (१९४०) हे आत्मचरित्र देशातील समाजसुधारणांचा अितिहास जाणून घेण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. म्हणून या ग्रंथास व्यक्तिगत व सामाजिक असे दुहेरी मूल्य लाभले आहे.

ग.त्र्यं. माडखोलकरांचे ` दोन तपे `( १९४६ ) व ` अेका निर्वासिताची कहाणी ` ( १९४९ ) हे दोन आत्मवृत्तात्मक ग्रंथ माडखोलकरांच्या अहंकारी वृत्तीचे दर्शन घडवितात. काका कालेलकरांचे ` स्मरणयात्रा `(१९४९) हे आत्मवृत्त अेक कुटुंबचित्र म्हणून हृद्य आहे. यात व्यक्तिदर्शनाप्रमाणेच बोधदर्शनही आहे.ना.सी. फडके व मा.वि. वरेरकर यांनी आपल्या वाङ्मयीन कर्तृत्वाविषयीचे आत्मनिवेदन अनुक्रमे ` माझ्या साहित्यसेवेतील स्मृति ` व ` माझा नाटकी संसार ` या ग्रंथातून केले आहे. त्यातून अुभय लेखकांच्या कलासक्त व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. ` हॉटसनवर रोखलेल्या पिस्तुलांतून ` (१९५०) या आत्मचरित्रात वा.ब.गोगटे यांनी हॉटसन प्रकरणाची व त्यांना भोगाव्या लागलेल्या आपत्तींची हकीकत सांगितली आहे.

या कालखंडात सामाजिक कार्यकर्त्यांनी जी आत्मचरित्रे लिहिली, ती पुढील पिढीच्या मार्गदर्शनासाठी लिहिली, अर्थातच त्यांचा दृष्टिकोन बोधवादी होता. कोल्हटकर, केळकर, फडके, माडखोलकर अित्यादि साहित्यिक व टेंबे बोडस यासारखे कलावंत जेव्हा आत्मचरित्रे लिहू लागले तेव्हा आत्मचरित्रात रोचकता निर्माण झाली. कारण या लेखकांनी बोधवादी दृष्टिकोणातून लेखन केले नाही. गतायुष्यातील स्मृतींना अुजाळा द्यावा व त्यांचे नि:संकोचपणे प्रकटीकरण करावे हा त्याचा आत्मवृत्तलेखनामागील हेतू होता. यादृष्टीने त्यांची आत्मचरित्रे बरीच यशस्वी ठरली, असे म्हणावे लागेल.

स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन

स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रापेक्षा पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची संख्या जास्त असली तरी मराठीतील चांगल्या आत्मचरित्रात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचाच उल्लेख करावा लागेल. स्त्रांचे पहिले आत्मचरित्रलेखन म्हणून रमाबाओ रानडे यांच्या ' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' (१९१०) या ग्रंथास मानाचे स्थान द्यावे लागेल. रमाबाओंचे हे आत्मचरित्र मराठीतील ओक अव्वल दर्जाचे आत्मचरित्र म्हणून गणले जाते. न्यायमूर्ती रानडे यांच्या निधनानन्तर लिहिलेल्या या ग्रंथात रमाबाओंनी पतीबरोबरील आपल्यासह जीवनाची हकीकत सांगितली आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत नामदार गोखले म्हणतात, ' आपल्या वयाची सत्तावीस वर्षे ज्यांनी त्या विभूतीबरोबर त्यांची सहधर्मचारिणी या नात्याने ' सावली ' प्रमाणे घालविली, ज्यांच्या अंगचे नैसर्गिक तेज शिक्षणाने व अतिथोर सहवासाने अनेक पटींनी वृध्दिंगत झाले व ज्यांचे मन रावसाहेबांच्या भक्तीत कायमचे गढून राहिले आहे, त्यांनी आपल्या दिगंतकीर्ति पतीच्या स्वभावाचे व आयुष्यक्रमाचे काढलेले चित्र आपणास पाहावयास मिळाल्याबद्दल महाराष्ट्रातील लोकांस अभिमान व समाधान वाटणे साहजिक आहे.'[१] पत्नीने पतीबद्दल अशा त-हेने लिहिलेला हा हिन्दुस्थानातील पहिलाच ग्रंथ आहे असेही त्यांनी नमूद केले आहे. पती हेच सर्वस्व मानणा-या अत्यंत सुजाण व समंजस अशा साध्वीचे हे आत्मचरित्र वाचताना महाराष्ट्रातील त्या महापुरुषाचे विशाल अंतःकरण व जसे जाणवते तव्दतच रमाबाओंच्या समर्पणशीलतेचेही दर्शन घडते.

स्त्रियांनी लिहिलेले आत्मचरित्र म्हणून ज्याला वाङ्मयगुणदृष्ट्या अग्रक्रम द्यावा लागेल असे आत्मचरित्र म्हणजे ' स्मृतिचित्रे ' होय. लक्ष्मीबाओ टिळकांनी लिहिलेले हे आत्मचरित्र मराठी साहित्यातील मानदंड होऊन बसले आहे. १९३४ ते १९३६ या कालावधीत चार खंडात ते प्रसिध्द झाले.

रे. नारायण वामन टिळक या मराठीतील सुप्रसिध्द कवीचे चरित्र सांगावे या हेतूने त्यांच्या पत्नीने या ग्रंथाचे लेखन केले आहे. ` स्मृतिचित्रां ` तून कवी ना.वा. टिळक यांचे चरित्र, लक्ष्मीबाआी टिळक यांचे आत्मचरित्र व तत्कालीन समाजस्थिती यांचा बोध होतो. म्हणून डॉ. मा.दि. फडके म्हणतात,... ` तसे हे आत्मचरित्र तिपेडी आहे. रे.टिळकांचे मन, लक्ष्मीबाआींचे मन आणि तत्कालीन जीवन यांचे धागे अेकमेकात मिळून गेले आहेत.` [४] व्यक्तिरेखनातील कौशल्य, अुत्कृष्ट प्रसंगनिर्मिती, खेळकर व विनोदी भाषाशैली व जीवनाकडे पाहण्याची तटस्थ वृत्ती या गुणांनी हे आत्मचरित्र नटलेले आहे. ` आधुनिक मराठी वाङ्‌मयात ` स्मृतिचित्रे ` ही आत्मचरित्र म्हणून निरपवाद अजोड आहेत, ` [५] असा डॉ. अ.ना.देशपांडे यांचा अभिप्राय आहे.

लक्ष्मीबाआींच्याही आगोदर पार्वतीबाआी आठवले यांनी ` माझी कहाणी ` ( १९२८ ) हे आत्मचरित्र प्रसिध्द केले. त्यांच्या आत्मचरित्रातून अनाथबालिकाश्र--माच्या प्रचारिका म्हणून त्यांनी केलेल्या कामाची हकीकत कळते. वयाच्या वीस वर्षापर्यंत अपंग पतीबरोबर संसार केल्यानंतर त्यांना वैधव्य आले. वयाच्या चाळीसाव्या वर्षी अमेरिकेत जाआून त्यांनी मोलकरिणीची कामे केली व तेथे द्रव्यार्जन करुन महर्षी कर्वे यांच्या संस्थेला आर्थिक सहाय्य केले. अेक दुर्दैवी विधवा स्त्री संधी मिळताच किती कर्तबगारी गाजवू शकते याचा बोध पार्वतीबाआींच्या जीवनातून होतो. आपल्या जीवनाला व विचारांना आण्णासाहेब कर्वे यांनी जी दिशा दाखविली त्याबद्दल त्या कृतज्ञ आहेत. त्यांच्या मतप्रणालीत जुन्या व नव्या विचारांचा संकर आढळतो. त्यांना बालविवाहाप्रमाणे प्रेमविवाहही नकोसा वाटतो. केशवपनाच्या रुढीविरुध्द स्त्रियांनी सत्याग्रह करावा असे त्यांना वाटते. केशवपनातील अमानुषता पटल्यावर त्यांनी पुन्हा आपले केस वाढविण्यास सुरुवात केली. विवाहित स्त्रियांनी लग्नानन्तरही आपला पोषाख व सौंदर्य

यांच्याकडे लक्ष देऊन पतीस प्रसन्न ठेवावे, असा आधुनिक संदेश त्यांच्या आत्मचरित्रात आढळतो. तसेच मागील पीढीतील कौटुंबिक जीवनाचे दर्शनही त्यांच्या आत्मचरित्रात घडते.

आनंदीबाअी अुर्फ बाया कर्वे यांच्या ' माझे पुराण ' (१९४४) या आत्मवृत्तातही समाजशास्त्राच्या अभ्यासकाला अुपयुक्त अशी माहिती मिळू शकते. जुन्या पिढीतील कोकणस्थ ब्राम्हणांच्या कुटुंबातील चालीरीतींची माहिती या ग्रंथातून कळते. तथापि या ग्रंथाचा अधिक महत्वाचा विशेष म्हणजे आनंदीबाअींनी नि:संकोचपणाने आणि प्रांजलपणाने केलेले आत्मनिवेदन हा होय. महर्षी कर्व्यांसारख्या थोर पुरुषाची आपण पत्नी आहोत याचा अहंकार आपणास होता, अनाथ बालकांना सांभाळण्याचे कार्य सोडून दिल्यास अितर सर्व व्यवहारात आपण स्वार्थ पाहिला, तरुणपणी आपल्याशी पापबुध्दीने काहींनी लगट करण्याचा प्रयत्न केला. या सर्व गोष्टी त्या मनमोकळेपणाने सांगतात. विधवांच्या कल्याणासाठी स्थापन झालेल्या ' शारदा सदन ' या संस्थेच्या आनंदीबाअी या पहिल्या विद्यार्थिनी. लग्नापूर्वी ' शारदासदना ' मध्ये कर्वे त्यांना भेटले व म्हणाले, ' मी गरीब आहे, पंडिता रमाबाअीकडे आहे, तसे माझ्याकडे नाही. तुला जर माझी गरिबी पसंत असेल, तर तुझ्या वडिलांच्या म्हणण्याप्रमाणे तुझ्याशी लग्न करण्याची माझी तयारी आहे. ' [६] हा संवाद महर्षी कर्व्यांच्या अंत:करणावर प्रकाश पाडणारा आहे. अेका थोर ऋषीतुल्य समाजसेवकाची सहचारिणी झालेली ही स्त्री पुढे अनेक अनाथ अपंगांचा आधारस्तंभ बनली, त्यांची जीवनगाथा अुलगडून दाखविणारे हे ' पुराण ' त्यातील प्रांजल आत्मकथनामुळे नेहमीच रसिकप्रिय राहील.

महर्षी कर्वे यांनी स्त्री-शिक्षणाच्या प्रसाराचे बहुमोल कार्य केले व त्यामुळे विद्यासंपन्न स्त्रिया आपली सुखदु:खे सांगण्यास सिध्द झाल्या. अिंग्रजी शिक्षणाने त्यांना मानसिक कोंडमाऱ्यातून मुक्ती मिळाली. फुले, आगरकर, कर्वे, शिंदे या समाजसेवकांनी स्त्रियांना नवविचारांची दीक्षा दिली. आनंदीबाअी कर्वे यांच्याप्रमाणेच डॉ. कमलाबाअी देह देशपांडे या कर्व्यांच्या स्त्री-शिक्षणकार्याशी निगडित होत्या. ' मुलींना अण्णा म्हणजे माय वाटे. अण्णांच्या आश्रमाच्या अभावी आपली काय स्थिती झाली असती ते विद्यार्थिनींना कळे व सुकून गेलेले निर्माल्य झालेले फूल पुन्हा टवटवीत व्हावे त्याप्रमाणे आयुष्य अण्णांच्या प्रेरणेने पुन्हा विकसित होत आहे, त्यांनी आपणास जीवदान दिले आहे, असे वाटे.' ७ हे डॉ. कमलाबाअींचे मत तत्कालीन स्त्री-जीवनात कर्वे यांच्या आश्रमाला किती महत्वाचे स्थान होते, हे दाखवून देते. ' स्मरणसाखळी ' ( १९४३ ) हे कमलाबाअींचे आत्मचरित्र स्त्री-शिक्षण संस्थेत त्यांना आलेल्या अनुभवांचे दर्शन घडविते. आरंभी काव्यमय स्वरुपाचे वाटणारे त्यांचे लेखन पुढे अहंकाराच्या दर्पाने व आत्मसमर्थनाच्या दोषाने कंटाळवाणे वाटू लागते. संस्थेतील राजकारणाचा व स्वत:वर झालेल्या अन्यायाचा अहवाल सादर केल्यामुळे आपले निवेदन रुक्ष व नीरस ठरेल, याचे भान त्यांना राहिलेले नाही. त्यांच्या आत्मवृत्तातील पत्रे, परिशिष्टे, अुतारे जि. कागदपत्रांकडे नजर टाकल्यास त्या आपली बाजू मांडण्यात कशा व्यग्र झाल्या आहेत, हे दिसून येते. अत्युच्च शिक्षण प्राप्त केलेल्या विदुषीच्या या आत्मचरित्राची अल्पशिक्षित अशा लक्ष्मीबाअी टिळकांच्या ' स्मृतिचित्रां ' शी तुलना केली म्हणजे वाङ्मयनिर्मितीसाठी शिक्षणाची मातबरी विशेष नाही, हे सहज पटते.

डॉ. कमलाबाओ देशपांडे यांच्या मानाने कमी शिक्षण लाभलेल्या लीलाबाओ पटवर्धन यांनी लिहिलेले ' आमची अकरा वर्षे ' (१९४५) हे आत्मचरित्र मात्र खूपच सरस अुतरले आहे. माधवराव पटवर्धनांसारख्या अेका थोर कवीची पत्नी होण्याचे भाग्य लाभल्याबद्दल लीलाबाओंना धन्यता वाटते. तथापि माधवरावांच्या व्यक्तिमत्वाचे यथार्थ वस्तुनिष्ठ दर्शन घडविण्यात त्यांच्या पतिप्रेमाने कोणतीच बाधा आणलेली नाही. माधवरावांचा लहरी स्वभाव, त्यांच्या अंगात येणारा ' वेताळ ', त्यांचा प्रारंभीचा अेकलकोंडेपणा व घरात मुलांची चिवचिव सुरु झाल्यावर त्यात घालेले परिवर्तन, या सर्व लहान लहान बाबीतून त्यांनी माधवरावांचे चित्र रेखाटले आहे. माधवरावांच्या काही कवितांचा जन्म कसा झाला, हेही त्यांनी सांगितले आहे. माधवरावांच्या सहवासात व्यतीत केलेल्या अकरा वर्षांची ही कहाणी अत्यंत हृद्य व वाचनीय आहे.

१९५० पर्यंतच्या कालखंडात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात अन्नपूर्णाबाओ रानडे यांचे ' स्मृतितरंग '(१९४७) व ग्वाल्हेरच्या अिंदिराबाओ भागवत यांच्या ' या सदाशिव ' ( १९४८ ) या दोन अतिसामान्य आत्मचरित्रांचाही समावेश करावा लागेल.

मराठीतील पुरुषांनी लिहिलेल्या व स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्र वाङ्मयाकडे नजर टाकली असता अेक गोष्ट सहज लक्षात येते की पुरुषांचे अनुभव विश्व हे स्त्रियांच्या अनुभव विश्वापेक्षा व्यापक व विशाल आहे. ते अनेक पदरी आहे. स्त्रियांचे ' घर हेच जग ' असल्याने पती हाच त्यांच्या जीवनातील केंद्रीभूत व्यक्ती आहे व तिचे महत्व त्यांना स्वत:हूनही अधिक वाटते. म्हणूनच, स्त्रियांच्या आत्मचरित्रांचे स्वरुप बव्हंशी पति-चरित्राचे आहे, असे दिसून येते. या आत्मचरित्रांच्या लेखिका पतिपरायण स्त्रिया होत्या व त्यांनी आपले जीवन आपल्या पत्नीच्या सुखदु:खात, त्यांच्या ध्येयवादात झोकून दिले होते.

पतीबरोबर व्यतीत केलेल्या सहजीवनाच्या कथा रंगविताना रमाबाओी, लक्ष्मीबाओी, आनंदीबाओी व लीलाबाओी यशस्वी झाल्या आहेत व वाचकांच्या डोळ्यासमोर न्या. रानडे, रमाबाओी , रेव्ह. टिळक - लक्ष्मीबाओी, महर्षी-कर्वे-आनंदीबाओी व माधव जूलियन लीलाबाओी या दंपती त्यामुळेच साकार झाल्या आहेत. केवळ स्वत:चेच जीवन रंगविण्याचा जेथे प्रयत्न झाला ती ` स्मरण साखळी,` ` माझी कहाणी ` ही आत्मचरित्रे यशस्वी झाली नाहीत.

पुरुषांच्या आत्मचरित्रात समाजस्थितीचे चित्रणही अधिक आले आहे. तात्यासाहेब केळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या आत्मचरित्रात हे दिसून येते. स्त्रियांच्या आत्मचरित्रात घरगुती जीवनातील सुखदु:खाशिवाय अितर कांही फारशी आढळत नाहीत. अर्थात याला संस्कृतीच कारणीभूत आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री बंधनात जखडली असून तिला दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे म्हणून पुरुषांच्या आत्मचरित्राचे स्वरुप मोकळ्या जागेतील वृक्षासारखे तर स्त्रियांच्या आत्मचरित्राचे स्वरुप कुंडीत लावलेल्या फुलझाडासारखे वाटते. ही फुलझाडे दिसायला मोहक असली तरी त्यांचा जीवमात्र लहान असतो.

लक्ष्मीबाओी टिळकांचे ` स्मृतिचित्रे ` हे या कालखंडातील नव्हे अेकंदर मराठी वाङ्मयातील आत्मचरित्राच्या दालनातील सर्वोत्कृष्ट आत्मचरित्र मानले जाते. ` ` स्मृतिचित्रे ` म्हणजे साहित्य - ` लक्ष्मी ` ने मराठीच्या आत्मचरित्रात्मक वाङ्मयाच्या अंगावर घातलेला अेक बहुमोल दागिना आहे.` [८] असा ` स्मृतिचित्रां ` चा गौरव अ.ना. देशपांडे यांनी केला आहे. पतीचरित्राबरोबरच स्वत:चेही चरित्र कथन करण्यात व अितर व्यक्तिरेखाबरोबरच स्वत:चीही अविस्मरणीय अशी व्यक्तिरेखा अकृत्रिमपणे रंगविण्यात व आपले आत्मचरित्र सर्व रसांनी सिध्द करण्यात केवळ लक्ष्मीबाओीच यशस्वी झाल्या आहेत, असे म्हणावे लागेल.

## ` स्मृतिचित्रां ` चे वाङ्मयीन स्वरूप -

### १. स्मृतिचित्रांची रचना

आपले पती रेव्ह. नारायण वामन टिळक यांच्या ` माझे चरित्र लिहायचे झाले तर ते घडले तसे लिहा ` [१] या अंतिम अिच्छेनुसार लक्ष्मीबाअींनी पतीचे चरित्र म्हणून स्मृतिचित्रांचे लेखन केले. ९ मे १९१९ रोजी टिळकांचे निधन झाले व १९२० साली बाअींनी स्मृतिचित्रांच्या लेखनास आरंभ केला. लक्ष्मीबाअींच्या शिरावरील संसाराचे ओझे त्यांच्या सुनेने आपल्या शिरावर घेतल्यामुळे त्यांना हे लेखन करण्यास अुसंत मिळाली. फावल्या वेळेतील विरंगुळा म्हणूनही या आठवणी लिहिल्या गेल्या. ` स्वत:च्या करमणुकीकरता मी माझ्या आठवणी लिहू लागले ` [१०] असे लक्ष्मीबाअी म्हणतात. देवदत्त टिळकांनाही आपल्या वडिलांचे चरित्र लिहावयाचे होते, म्हणून त्यांनीही आपल्या आअीला - लक्ष्मीबाअींना - या आठवणी लिहिण्यास प्रोत्साहन दिले. या आठवणीपुढे योगायोगाने श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी वाचल्या व त्यांना ते लेखन कादंबरी सदृश वाटले. ` या आठवणी अवश्य छापा, फारच सुंदर आहेत ` [११] अशी त्यांनी बाअींना सूचना केली. तात्यासाहेब कोल्हटकरांचे पुत्र बापूराव कोल्हटकर यांनी ` संजीवनी ` हे पत्र सुरू केल्यानंतर त्यात या आठवणी प्रसिद्ध होअू लागल्या व हा अनमोल खजिना महाराष्ट्राच्या हाती लागला. लक्ष्मीबाअींनी ` स्मृतिचित्रां ` मध्ये आपल्या बालपणापासून ते रे. टिळकांच्या मृत्यूपर्यंतची हकीकत आठवणीरूपाने सांगितली आहे. रेव्ह. टिळकांच्या धर्मान्तरापर्यंतची स्मृतिचित्रे पहिल्या भागात, त्यांच्या दीक्षेपर्यंतची दुसऱ्या भागात, त्यांच्या मृत्यूपर्यंतची तिसऱ्या भागात, व लक्ष्मीबाअींच्या निधना आगोदर पर्यंतची चौथ्या भागात, अशी स्मृतिचित्रांची रचना आहे. लक्ष्मीबाअींनी चौथ्या खंडातील फक्त ११ प्रकरणे लिहिली असून त्यांच्या आत्मचरित्राला त्यांच्या मृत्यूपर्यंतच्या चरित्राची पुरवणी जोडून

देवदत्त नारायण टिळक यांनी स्मृतिचित्रांना पूर्णता प्राप्त करून दिली आहे. १५ डिसें. १९३४ ला स्मृतिचित्रांचा पहिला भाग लिहून झाला. १५ डिसें. १९३५ पर्यंत तीन भागांचे लेखन झाले व १९३६ साली स्मृतिचित्रांचे लेखन पूर्ण झाले. स्मृतिचित्रांच्या तिसऱ्या भागाच्या प्रकाशनसमयीच म्हणजे १५ डिसें. १९३५ ला लक्ष्मीबाई टिळकांचा सत्कार आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथील सर्कल थिएटर मध्ये झाला व आचार्यांनी त्यांना `साहित्यलक्ष्मी` ही सार्थ पदवी दिली.

२. समाजदर्शन -

`स्मृतिचित्रे` हा लक्ष्मीबाईंच्या ना.वा. टिळकांबरोबर व्यतीत केलेल्या सहजीवनाचा जसा इतिहास आहे, तसाच तो १८७३ ते १९३६ या काळातील महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचाही स्थूल इतिहास आहे. या कालखंडातील महाराष्ट्रातील कुटुंबसंस्था, शिक्षण, विवाह पध्दती, दांपत्यसंबंध, सामाजिक जीवन व प्रबोधन यांच्या विकासाच्या अभ्यासासही हे आत्मचरित्र आधारभूत ठरू शकते.

गंगाधर गाडगीळ म्हणतात, `तत्कालीन समाजस्थितीचेही तपशीलवार चित्रण स्मृतिचित्रात आढळते... तेंव्हाचे कौटुंबिक जीवन, कुटुंबातील माणसात असलेले अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध, परस्परांच्या मदतीला उभे राहण्याची तेव्हाची वृत्ती, समाजातल्या वेगवेगळ्या वर्गांचे परस्परसंबंध आणि मुख्य म्हणजे त्या काळातील स्त्रीजीवन याविषयी कितीतरी माहिती अनेक बारकाव्यासहित लक्ष्मीबाईंनी दिली आहे.`[१२] लक्ष्मीबाईंची तीव्र स्मरणशक्ती, त्यांचा परखड व प्रांजल स्वभाव यामुळे स्मृतिचित्रांचे इतिहास म्हणून मोल फार मोठे आहे. ख्रिस्ती धर्म व हिंदू धर्म यांच्यातील संघर्ष, तत्कालीन धार्मिक कल्पना, यांचे त्यांनी उद्बोधक चित्र रेखाटले आहे. आपल्या वडिलांना झालेल्या सोवळ्यांची जी

हकीकत त्यांनी सांगितली आहे, तीतून तत्कालीन समाजमनावर वर्चस्व गाजविणा-या सोवळ्या ओवळ्याच्या कल्पनांचेही दर्शन कडते. नानांना - लक्ष्मीबाईंच्या वडिलांना हे सोवळे कसे झाले होते, हे त्यांच्या मुखातून अैकणेच योग्य. `मी तपोवनात गेली होतो, तेथे अेक महार तोंड धूत होता आणि त्याचा शिंतोडा माझ्या अंगावर अुडाला. मला त्याचा विटाळ झाला.`[१३] १८५७-५८ साली नानांना झालेला हा विटाळ त्यांच्या अंतापर्यंत म्हणजे पंचवीस-सव्वीस वर्षे टिकला. बाहेरुन घरात येणारी प्रत्येक जिन्नस, अगदी अन्नधान्य, तेल, तूप, मीठ, गूळ, साखर धुवून घरात घ्यावी असा त्यांचा दंडक असे। या त्यांच्या जाचक नियमामुळे सर्व घरदारच काय पण सारा गांव देखील कसा त्रासून गेला होता, याचे हृद्य वर्णन लक्ष्मीबाईंनी केले आहे.

तत्कालीन अेकत्र कुटुंब पध्दतीचे चित्रही स्मृतिचित्रात आढळते. त्या काळातील स्वस्ताई, अन्नधान्याची विपुलता यामुळे अुपजीविका चालविणे कठीण पडत नसे. परगावी राहणा-या व्यक्तीस दहा रुपये मासिक खर्च पाठविला, तर त्यात त्याचे सहज मागत असे. विपुल संतती किंवा कुटुंबनियोजनाचा अभाव हे त्या काळाचे अेक वैशिष्ट्य मानावे लागेल. `मला अेकंदर पाच मावंडे होती, तशी झाली पुष्कळ, पण जगली पाच.`[१४] हे लक्ष्मीबाईंचे विधान यादृष्टीने सूचक मानावे लागेल.

हिन्दु समाजात असणा-या हुंडा पध्दतीला विरोध करुन टिळकांच्या लग्नात त्यांच्या वडिलांनी - वामनरावांनी हुंडा घेतला नाही. `मी हुंडा घेवून आपल्या मुलाला विकणार नाही `[१५] असे त्यांनी वधूपक्षाला कळविले होते. तथापि गणगोत्र-पत्रिका पाहणे, टिपण जुळणे याला ते फार महत्व देत. `टिपण मात्र चांगले जुळले पाहिजे `[१६] असेही त्यांनी वधूपक्षाला कळविले होते व त्यानुसारच लग्न ठरले. लग्नात गोखले व टिळक यांच्या भिन्न गोत्रामुळे निर्माण झालेली अडचण शास्त्राधाराप्रमाणें दत्तकविधानाच्या मार्गाने सोडविण्यात आली.

लग्नामध्ये गावजेवण देण्यात आले. सुपाऱ्या खेळणे, गुळण्या टाकणे, घास घालणे, वगैरे रूढ प्रकार भोजनप्रसंगी पार पाडण्यात आले.

सासुरवासाचे विविध प्रकारही या आत्मचरित्रातून दिसून येतात. टिळकांचे वडील वामनराव यांनी लक्ष्मीबाईंना खूपच त्रास दिला . दुपारी पुरुषांची जेवणे झाली की लक्ष्मीबाई जेवायला बसत. पण वामनराव त्यांना शेण गोळा टाकण्यासाठी कचरा टाकण्यासाठी किंवा तुळशीला पाणी घालण्यासाठी [redacted] पुन: पुन्हा उठवीत. ते म्हणत , " तुम्हाला जेवणाची कशी आठवण राहते ? जेवला नाही तर मराल का ? आणि मेलात तर तुमच्या वाचून जग ओस पडेल का ? " [१७] असा कार्यक्रम रोज दुपारी होई. रात्रीही ते लक्ष्मीबाईंना लवकर जेवू देत नसत. लक्ष्मीबाई जेवायला बसल्या की वामनराव त्यांना हाक मारून बिछाना टाकायला लावीत. त्यानंतर त्या पुन्हा जेवायला बसत. एकदा त्यांनी घासलेल्या भांड्यांना डाग राहिले होते म्हणून वामनरावांनी भांडी खाली फेकली व आपल्या सुनेचा व मुलाचा पुढील शब्दात उध्दार केला, " माझी सून मेली, तिचा आज बारावा आहे, माझा मुलगा मेला, त्याला तिलांजली देतो. " [१८] लक्ष्मीबाईंना कोकणातले पदार्थ करता येत नसत व त्यावरूनही वामनराव त्यांना खूप रागावीत. आमटीला जिवंत फोडणी देता येत नाही किंवा तांदळाच्या भाकऱ्या व पेजबुड्या भात करता येत नाही म्हणून त्यांचा लक्ष्मीबाईवर कोप होत असे. वामनरावांनी आपल्या गर्भारशी पत्नीला लाकडे फोडायला लावली होती व तिचा शेवटही त्यांनी लाथ मारून खाली पाडल्यामुळे झाला होता, तेव्हा लक्ष्मीबाईंचा त्यांच्यापुढे काय पाड ? पुढे पुढे तर ते आपल्या मुलाला दुसरी बायको कर म्हणून आग्रह करू लागले. यावरून त्या काळातील सासुरवाशिणी स्त्रियांच्या हालअपेष्टांची व त्यांना दासी मानून गुलामगिरीत ठेवणाऱ्या समाजाच्या प्रतिगामी दृष्टिकोनाची कल्पना येते.

`रांधा वाढा - उष्टी काढा` हेच स्त्रीच्या नशिबी लिहिलेले होते. समाजात पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ अशी व्यवस्था असल्यामुळे स्त्रीच्या कष्टमय व अपमानित जिणे आले होते. `सर्वस्वी पराधीन, अस्तित्वहीन, समर्पित जिणे हे स्त्रीचे लेणे !` [१९]अशा समर्पक शब्दात सौ. प्रतिमा ठिपसे यांनी तत्कालीन स्त्री-जीवनाचे वर्णन केले आहे.

तत्कालीन समाजामध्ये रुढी व अंधश्रध्दा यांचे प्राबल्य आढळते. देवी अंगात येणे, अंगात वारे येणे असे प्रकार लोकांच्या भाबडेपणामुळे व अज्ञानामुळे प्रचलित होते. लक्ष्मीबाआीची सासरे वामनराव यांच्या अंधश्रध्देवर प्रकाश टाकताना लक्ष्मीबाआी म्हणतात, `भुतेखेते, जादूटोणा, अंगात येणे, पायगुण, ग्रह, टिपण, हातापायांच्या बोटांची लांबी रुंदी ह्या गोष्टीवर त्यांची माणसाविषयीची आवडनिवड अवलंबून असे. त्यांच्या अंगात येणारी देवी तर त्यांचे फारच आवडते दैवत.` [२०] अेके दिवशी या देवीने त्यांना सांगितले, `आता जी मुलगी सून झाली आहे ती फार वाआीट आहे पायगुणाची आहे. हिच्यामुळे घरात सुख व शांति नांदणार नाही.` [२१]देवीच्या या प्रलापामुळेच पुढे वामनरावांनी लक्ष्मीबाआींचा छळ केला.

हिन्दुधर्माविषयीचा अभिमान हेही त्याकाळाचे वैशिष्ट्य मानावे लागेल. या अभिमानापोटीच अन्य धर्मीय लोकाबद्दल विशेषत: ख्रिस्ती लोकांबद्दल तिरस्काराची भावना समाजात निर्माण झाली होती. टिळकांच्या आआीकडे मिशनरी मडमा येत व त्या तिला शिवणकामाचे शिक्षण देत, हे वामनरावांना आवडत नसे. या मडमांनी तिला वाचायला दिलेले बायबल मधील नीतीचे पुस्तक वामनरावांनी जाळून टाकले. पुढे टिळकांनी धर्मान्तर केले (१८९५) व सारा समाज ढवळून निघाला. टिळकांनी ख्रिस्ती व्हावे म्हणून ख्रिस्ती धर्म धर्मप्रचारक त्यांना प्रलोभने दाखवीत तर त्यांनी ख्रिस्ती होअू नये म्हणून नागपूरकर आप्पासाहेब बुटी त्यांना `मी तुम्हास शंभर रुपये तुमच्या ह्यातीपर्यंत देतो,

घर देतो व दत्तूची विद्या करतो ' [२२] असे सांगून धर्मान्तरापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत. ख्रिस्ती धर्मीयांची धर्मप्रसाराची व हिन्दू धर्मीयांची धर्मरक्षणाची भूमिका येथे दिसून येते.

ख्रिस्ती धर्मीयांची टवाळी करणे, ख्रिस्ती धर्म व त्यातील विधी याबद्दल कुत्सितपणे बोलणे असे प्रकारही त्यावेळी हिन्दु धर्माभिमानी लोकांच्या हातून घडत असत. वाओमध्ये गणेशोत्सवामध्ये व्याख्यान देणाऱ्या टिळकांना अेकाने ' काय हो, तुमच्यात बाप तीस व मा अेक असते नाही का ! ' [२३] असा प्रश्न बाप्तिस्मा ' या शब्दावर कोटी करीत विचारला होता.

टिळक ख्रिस्ती झाल्यावर हिन्दुसमाजाने त्यांच्यावर जवळजवळ बहिष्कार टाकला होता. टिळक व लक्ष्मीबाओ अहमदनगर येथे वेगळे बिऱ्हाड करून राहू लागल्यानंतर त्यांच्याकडे काम करणाऱ्या मोलकरणीला लोकांनी काम सोडायला लावले व त्यांच्याकडे पाणी भरणाऱ्या गुजराथ्याला तर प्रायश्चित्त घेण्यास भाग पाडले. त्यांच्या घरमालकीणीनेही त्यांना निरोप पाठविला की ' ' तुम्ही आमच्या पायखान्यात जायचे नाही ! .... सार्वजनिक पायखान्यात जा. ' [२४] धर्मांतरितासाठी पायखानेही कर्मठ झाले ! शेवटी डॉ. ह्यूमसाहेबांनी फर्ग्युसन गेट कम्पाअुन्डमधील ख्रिस्ती वस्तीत त्यांना जागा दिली. अशा प्रकारचे हाल सहन करीत टिळक दाम्पत्याला बराच काळ कंठावा लागला.

' स्मृतिचित्रातून अशाप्रकारे समाजस्थितीचे वर्णन आढळत असले तरी लक्ष्मीबाओंनी ते जाणीवपूर्वक दिलेले नाही. समाजस्थितीविषयक लक्ष्मीबाओंनी दिलेली माहिती अगदी सहजगत्या या ग्रंथात आलेली आहे. गंगाधर गाडगीळ यांचे या संदर्भातील विधान अत्यंत मार्मिक आहे. ते म्हणतात, ' खरे म्हणजे लक्ष्मीबाओंनी जी दिली आहे ती मुळी माहिती नव्हेच ! त्यांचे सारे अनुभवाचे विश्वच ' स्मृतिचित्रांत प्रकट झाले आहे. आणि अनुभवात अपरिहार्यपणे

माहिती विरघळलेली असते, म्हणूनच स्मृतिचित्रात माहिती देखील आहे.' २५

'स्मृतिचित्रा'त आलेले समाजदर्शन उद्‌बोधक असले तरी त्यामुळे त्यांच्या कलात्मकतेला कोणतीही बाधा आलेली नाही, हे लक्ष्मीबाईंच्या लेखणीचे मोठेच यश मानावे लागेल. समाजदर्शनाच्या या अभ्यासामुळे 'स्मृतिचित्रां'तील व्यक्तींच्या मनोभूमिकेचे आकलन होण्यास बरीच मदत होते.

३. प्रसंगनिर्मिती -

आत्मचरित्र ही वास्तव जीवनाची कहाणी असते. आत्मचरित्रकार आपल्या जीवनात घडलेल्या विविध प्रसंगांचे वर्णन करून आपल्या जीवननाट्याची कल्पना वाचकास देत असतो. लक्ष्मीबाई टिळकांनीही त्यांच्या जीवनातील अनेकविध प्रसंग 'स्मृतिचित्रा'त वर्णिले आहेत. 'स्मृतिचित्रे' ही एका दृष्टीने अनेक प्रसंगांची मालिकाच आहे. जीवनातील नाट्य हेरण्याची प्रतिमा त्यांच्याजवळ असल्याने अनेक नाट्यपूर्ण प्रसंगांची निर्मिती त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केली आहे. हे सर्व प्रसंग टिळक व लक्ष्मीबाई या दांपत्याच्या स्वभाव वैशिष्ट्यातून निर्माण झालेले आहेत. या प्रसंगांचे चित्रण आपल्या ओघवती शैलीत व विनोदबुद्धीची जोड देऊन त्यांनी केले असल्यामुळे या सर्व प्रसंगानिर्मितीवर प्रसन्नतेचा व निरागसतेचा ठसा उमटलेला आहे.

आपल्या आयुष्यातील विचित्र व मजेदार योगायोगाचे एक उदाहरण म्हणून त्यांनी मैत्रिणीच्या घरी टिळकांनी आपणास कसा दम दिला ( तंगडीच मोडीन ) व पुढे आपण त्याच घरात कसे पाय रोवून उभे राहिलो, याचे मिस्किलपणे वर्णन केले आहे. हा प्रसंग तसा साधाच आहे पण लक्ष्मीबाई व रेव्ह. टिळक यांच्या जीवनाच्या संदर्भात तो पाहिला म्हणजे आश्चर्य वाटते. त्यांच्या सहजीवनाचे ते रूपकच आहे, असे वाटू लागते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आपल्या सासू-सासऱ्यांविषयी लिहितांना त्यांनी अेका करुण प्रसंगाचे अत्यंत मोजक्या पण प्रभावी शब्दात वर्णन केले आहे. आपला नवरा आजारी आहे म्हणून अुन्हातान्हातून कित्येक मैल चालत आलेल्या टिळकांच्या आओस वामनराव लाथ मारतात व त्यानंतर आठ दिवस अंथरुणास खिळून तोंडात पाण्याशिवाय काही न घेता ती साध्वी प्राण सोडते. हा प्रसंग काळीज हेलकावून टाकणारा आहे.

मुंबओत टिळकांबरोबर रहावयास गेलेली मनु ( लक्ष्मीबाओंचे माहेरचे नाव ) जरा काही आवाज झाला की धावत गॅलरीत जाअून बाहेर टकामका पहात असते व त्याचवेळी पत्ता माहीत नसल्यामुळे मनूचा शोध घेत मुंबओभर वणवण हिंडणाऱ्या गोविंदराव मामाशी तिची अचानक दृष्टादृष्ट होते. हा प्रसंग अेखाद्या विनोदी चित्रपटात साजेसा असा आहे. त्याचबरोबर मनूच्या ओढीने गोविंदराव मामांना वणवण फिरावे लागते याचे वाचकांना दुःख होते.

सोंगट्यांच्या खेळाचेही त्यांनी मोठे बहारीचे वर्णन केले आहे. टिळकावर डाव अुलटू लागला की ते चिडत. अशावेळी लक्ष्मीबाओंना खूप हसू येओ. टिळक रागावले की त्या जास्तच हसू लागत. अशा अेका प्रसंगाचे वर्णन त्यांनी पुढील शब्दात केले आहे. " सोंगट्या, पट, फासे थरथर कापू लागली. काहींनी खालील गटाराचा आश्रय केला. घातलेले बिछाने घरात सैरावैरा धावू लागले. सगळ्या सामानाने बंड पुकारले. जागच्याजागी काही राहिले असेल तर ते फक्त लायको व दिवा । प्रकरण अितके हातघाओवर आले, की शेवटी दिव्यानेही राम म्हटले. आगपेटी केव्हाच पासोडीचा आसरा करुन बिछान्याच्या ढिगाऱ्यात तोंड लपवून बसली होती. तरी मला वाटत होती गंमत. मी आणखी जोरजोराने हसू लागले.

आता त्या युद्धकांडातील शेवटची माग. जिन्याला नव्हते दार ! टिळकांनी मला अंधारात लोटले. मी जिन्यातून ` घालीन लोटांगण वंदीन चरण ` करीत खाली तबकडीत येऊन पडले. टिळकांचा राग मावळला व माझे हास्य पळाले. `[२६]असे वर्णन करून शेवटी त्या अगदी सहजपणे म्हणतात, ` मला तो सातवा महिना होता. ` ही शेवटची कलाटणी पती-पत्नींच्या पोरकट भांडणाला अेक वेगळाच अर्थ प्राप्त करून देते. त्याबरोबरच पती-पत्नीतील विकासशील संबंधातील अेक महत्वाचा टप्पा म्हणूनही वाचक या प्रसंगाची नोंद घेतात.

लक्ष्मीबाअींच्या पेंडशांकडील मुक्कामात त्या अुतरल्या त्या वाड्याची भुताखेतासाठी प्रसिध्दी होती. रात्रीच्या वेळी मनूचा शोध घेण्यासाठी अंधारात हातात दिवा घेअून आलेली त्यांची बहीण भिकूताअी व त्यावेळी तबेल्यातून अेकू येणारा धपधप आवाज अैकून लक्ष्मीबाअींची भीतीने गाळण अुडते, तो प्रसंग अत्यंत हास्यकारक आहे.

टिळक लक्ष्मीबाअींना शिकवीत असताना लक्ष्मीबाअींना ` शब्द म्हणजे काय ? ` या टिळकांच्या प्रश्नाचे अुत्तर देता आले नाही. टिळक संतापले व त्यांनी सारी पुस्तके फाडून टाकली. या प्रसंगाचे वर्णन त्यांच्याच शब्दात वाचण्यासारखे आहे. -

` टिळक म्हणाले, ` शब्द म्हणजे काय ? `
.... ` शब्द म्हणजे शब्द. ` मी अुत्तर केले.
` पण शब्द म्हणजे काय ? `
` शब्द म्हणजे शब्द ! `
` पण शब्द म्हणजे काय ? `

पुन्हा माझे आपले शब्द म्हणजे शब्दच ठेवलेले. झाले ! टिळक खूप संतापले. ते संतापत तसतशी मी हसूं लागे. तसतसे ते आणखी संतापत.

शेवटी संतापाग्नीने व माझ्या हास्याच्या वायूने मोठा भडका अुडाला. तो भडका होताच पुस्तकांचा भडका अुडाला ! टिळकांनी सारी पुस्तके टराटर फाडून टाकली व त्या चिंध्यांच्या ढिगाऱ्याला काडी पेटवून लावून दिली! ' [२७] अितके वर्णन करून त्या म्हणतात, ' हा आमचा पहिल्या दिवसाचा ' अभ्यास. ' या प्रसंगातून टिळकांना आपल्या पत्नीला शिकविण्या विषयी असलेल्या तळमळीचे व लक्ष्मीबाअींच्या निरागस मनाचे दर्शन होते. नेहमीच्या पध्दतीने लक्ष्मीबाअींनी या प्रसंगालाही विनोदाची डूब दिली आहे.

मृत्युशय्येवर असणाऱ्या टिळकांच्या मन:स्थितीचेही त्यांनी धीरोदात्तपणे चित्रण केले आहे. लक्ष्मीबाअींशी झालेल्या शेवटच्या भेटीत टिळक म्हणाले ' मी आता बरा आहे. लौकरच बरा होअीन. काळजी करू नको. मला माझी दोन मोठाली कामे अजून करावयाची आहेत. ख्रिस्तायन व देवाचा दरबार. माझे आवडते गाणे कोणते आहे सांग पाहू ! ' असे म्हणून त्यांनी ' शत्रु गराडा घालून बसले । बसोत त्यांना कोण पुसे ' या गीताची आठवण करून दिली व ' १९१९ साल हे लक्षात ठेवण्यासारखे होणार आहे. ' असे सूचक अुद्गार काढले. लक्ष्मीबाअी म्हणतात, ' हा मला अुपदेश आहे हे मी ओळखले. माझे अंत:करण भडभडून आले व माझे ओले डोळे त्यांच्या दृष्टीस पडू नयेत म्हणून मी हळूच बाहेर आले व मनसोक्त रडले. ' [२८] या करुण प्रसंगावर गांभिर्याची व अुदात्ततेची छाया पसरलेली आहे.

आअीने मारुतीला वडयांची माळ अर्पण करावयास दिली असता ती स्वत:च खाअून टाकणारे टिळक अखेर अीश्वराचे परमभक्त बनतात. मला अहो-जाहो का म्हणत नाही म्हणून भांडणारे बालकवी लक्ष्मीबाअींनी आपणास ' हत मूर्खा ' म्हणावे म्हणून हट्ट धरतात. आपली बहीण कोठे मेली ते मुद्दाम पाहून आलेली लक्ष्मीबाअींची आअी तशाच दुखण्याने पुढे जवळच्या गावात निधन पावते हे सर्व - संवाद-विरोधाची नाती सांगणारे प्रसंग स्मृतिचित्रांना रंगत आणतात.

लक्ष्मीबाईंनी आपल्या जीवनातील सुखदु:खाचे, रागा-लोभाचे व हास्य-रुदनाचे प्रसंग उत्कृष्टपणे टिपले आहेत. या प्रसंगांचे वर्णन करताना त्या कुठेही मार्दव करीत नाहीत. ' झाले गेले आता काय त्याचे ' या दृष्टीनेच त्या गतायुष्यातील घटनांकडे पाहतात व म्हणूनच अगदी तटस्थपणे पण समरसून प्रत्येक प्रसंगाचे वर्णन करतात. आपल्या जीवनातील घटनांचा चित्रपट त्या वाचकापुढे अगदी नि:संकोचपणे सादर करतात. या सर्व भावनोत्कट व नाट्यात्मक प्रसंगांच्या आधारे लक्ष्मीबाईंनी ' स्मृतिचित्रे ' तील व्यक्तिरेखांना जिवंत केले आहे.

४. <u>भाषाशैली -</u>

अेखाद्या कलाकृतीचे यश तीतील आशयाप्रमाणेच शैलीवरही अवलंबून असते. त्या त्या प्रसंगाला व रसाला अनुकूल असे अर्थवाहक व ध्वनिवाहक शब्द व वाक्ये यांची योजना लेखकाने केली म्हणजे शैलीचे माधुर्य-निर्माण होते. हे शैलीचे माधुर्य आपणास लक्ष्मीबाईंच्या लेखनात आढळते. '..., ' भाषाशैली ', ' भाषाशैली ' , म्हणून ज्याला आपण म्हणतो ते दुसरे काही नसून भाषेतला सहजपणा होय. '[२१] हे प्रा.ना.सी.फडके यांचे विधान लक्ष्मीबाईंच्या भाषाशैलीस समर्पकपणे लागू पडते. ' स्मृतिचित्रे ' तील भाषाशैली हे ' स्मृतिचित्रे ' चे अेक विलोभनीय वैशिष्ट्य असून त्यातील आशयाचे सौंदर्य लक्ष्मीबाईंच्या मार्मिक शैलीमुळे अधिक वाढले आहे. शैली ही लेखकाच्या व्यक्तिमत्वाचेच अेक अंग असते म्हणून ' स्मृतिचित्रे ' तून लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्वाचाच आविष्कार होतो.

लक्ष्मीबाईंनी आपल्या जीवनातील विविध आठवणी विविध प्रसंगांच्या आधारे सांगितल्या आहेत. ' स्मृतिचित्रे ' तील प्रसंगनिर्मिती हा म्हणूनच लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्वाचाच अेक विशेष आहे. नानांची खोडकी मोडण्यासाठी गंगेवर जीव देण्याचा बालपणातील प्रसंग जितक्या आकर्षकपणे त्या रंगवतात,

तितक्याच व्याकूळतेने टिळकांच्या धर्मान्तरानन्तरच्या स्वत:च्या दयनीय अवस्थेचे चित्रण करतात. दत्तूसाठी दूध किंवा भात मागण्याचा अपमानास्पद प्रसंग व टिळकांनी धान्याअैवजी काचेची सुंदर दौत आणल्याचा अुव्देगजनक प्रसंग त्या तितक्याच अुत्कटतेने रंगवितात - ' आता का ही दौत शिजत घालू ! ' या अेकाच वाक्यातून त्यांच्या मनाची तगमग त्या सहजपणे अभिव्यक्त करतात.

निवेदनचातुर्य हा लक्ष्मीबाअींचा अेक विशेष आहे. गतकाळातील गोष्टींकडे त्या अलिप्तपणाने पाहतात. आपल्या निवेदनाला त्या विनोदाची जोड देतात. त्यांचा विनोद हा दुखविणारा नसून सुखविणारा आहे. मामंजींच्या अंगात देवीचा संचार होत असे, हे सांगताना त्या म्हणतात, ' बहुत करून अेखाद्या आठवड्यात मामंजींच्या मनाविरुध्द आमच्यापैकी कोणाचे वर्तन घडले, की देवी त्या शुक्रवारी हटकून आमच्याविरुध्द आकांडतांडव करायची. ' [३०]

' जिवंत ' फोडणीची त्यांनी सांगितलेली कथा अगदी चटकदार आहे. मामंजींच्या पूजेच्या अुपकरणांना नेहमी डाग पडत. त्यांचे कारण सांगताना त्या म्हणतात, ' अुपकरणी होती तांब्याची, पाणी विहिरीचे, राख लाकडाची व दिवस पावसाचे. ' [३१] अलंकारांची माहिती नसतानाही अशी अनुप्रासात्मक वाक्ये त्या सहज लिहून जातात. मामंजी संतापाने अुपकरणी फेकू लागतात व स्वत:च्या पायाची शपथ घेण्यास ते लक्ष्मीबाअींना सांगतात. त्याचबरोबर पायांना स्पर्श केल्यास ' तू जळून जाशील ' अशी भाषा ते वापरतात. त्यावर लक्ष्मीबाअी म्हणतात, ' शेवटी पालथी पडले व त्यांचे पाय गच्च धरले. मी काही जळून मेले नाही. मोठी निराशा झाली माझी. अेकदाची मरून गेले असते तर बरे झाले असते, असे मलाही झाले होते. पण मामांजींची तेवढी तपश्चर्या नव्हती म्हणा, किंवा मी अुपकरणी खरोखरच घासली होती म्हणा, मी त्या दिवशी जळाले काही नाही । ' [३२] भिकूताअींकडे हडळ पाहिल्याचा प्रसंगही त्यांनी मोठ्या विनोदी पध्दतीने वर्णिला आहे.

अगदी साध्या व मोजक्या शब्दात आत्मकथन करण्याची त्यांची लेखनशैली त्यांच्या लिखाणाला नाट्यात्मकता प्राप्त करून देते. लक्ष्मीबाईंनी जातिभेद न पाळण्याचा निर्णय घेतल्यावर टिळकांची प्रतिक्रिया सांगताना लक्ष्मीबाई लिहितात. " ते म्हणाले, ' थँक गॉड.' "[३३] या दोन शब्दात त्या टिळकांच्या मानसिक जगाचे दर्शन घडवितात. टिळक व लक्ष्मीबाईंच्या सहजीवनावर प्रकाश टाकणारे पुढील वाक्यही असेच मार्मिक आहे. लक्ष्मीबाई लिहितात " त्यांनी लग्नाच्या वेळी फकिरीची माळ माझ्या गळ्यात घातली होती व मी बेफिकिरीची माळ त्यांच्या गळ्यात घातली होती." [३४] ' मी लंकेची पार्वती व टिळक कफल्लक शंकर ' हे वाक्यही त्यांच्या प्रपंचाचे दर्शन घडविते. नाशिक स्टेशनवर टिळकांची गाडी चुकल्यावर ' मी आपली मिटी मिटी पहात उभी राहिले ' असे स्वतःचे " त्यांनी केलेले वर्णनही अगदी यथार्थ व चित्रप्राय आहे. टिळकांच्या मृत्यूनंतर स्वतःच्या जीवनाला आलेल्या एकाकीपणाचे वर्णन त्यांनी ' टिळकांच्या अस्थी पेटीत जाताच माझे अस्तित्व जाणवू लागले, "[३५] व ' आता माझा सूत्रधार गेला '[३६] अशा करुणगंभीर वाक्यात अगदी समर्पकपणे केले आहे.

लक्ष्मीबाई टिळकांच्या भाषाशैली विषयी कमलाबाई देशपांडे म्हणतात, " लांबलचक वाक्यापेक्षा केवळ शब्दांची त्रोटक वाक्ये लिहिण्यातच त्यांचा हातखंडा आहे. "[३७] ' काळजी काय ती खाण्याची व नाण्याची, '' जन्मभर माझी बेरीज व टिळकांची वजाबाकी चालू असे, ' ' माणसाने दिलेले पुरत नाही व देवाने दिलेले सरत नाही, ' ही वाक्ये त्यांच्या अल्प शब्दात संपन्न आशय सांगणाऱ्या लेखनशैलीचा विशेष स्पष्ट करतात.

नाट्यपूर्ण संवाद, बोलीभाषेचा वापर, मधून मधून म्हणींचा वापर अशा त्यांच्या लेखनशैलीच्या वैशिष्ट्यामुळे ' स्मृतिचित्रे ' अधिकच उठावदार झाली आहेत. ' ताटाबरोबर काठही गेला ', ' बुवाचे तुरे लाल, बाईचे बुरे हाल ',

` नानाजीचा पत्ता बसल्यावर अन्नाजी कोठून येणार ! ` ` यासारख्या म्हणींच्या वापराने निवेदन अधिक आकर्षक झाले आहे.

` स्मृतिचित्रांच ` ची भाषा ही मध्यमवर्गीय स्त्रियांची घरगुती भाषा असल्यामुळे ती साधीसुधी व मनमोकळी आहे. ती त्यामुळेच पुस्तकी भाषा न वाटता जिवंत भाषा वाटते. साहित्यिक भाषेचा हव्यास न बाळगल्यामुळे तिच्यात कोणत्याही प्रकारची कृत्रिमता नाही, दिखावा नाही किंवा अलंकाराचा सोस नाही. बोलीभाषेपासून दूर न जाता अनुभवांचे संपन्न विश्व शब्दांकित करता येते, हे अितरांना दाखवून देण्याची अवघड कामगिरी त्यांनी पार पाडली आहे. म्हणूनच गंगाधर गाडगीळ यांनी ` लक्ष्मीबाअींची भाषाशैली हा साहित्यिकांच्या दृष्टीने अेक मानदंड झाला आहे. त्यांना बोलीभाषेकडे पुन:पुन्हा खेचून आणणारा लोहचुंबक झाला आहे. भाषेला मिळणाऱ्या अिंग्रजी व संस्कृत वळणावरचा जबरदस्त अुतारा झाला आहे ` [३८] असा सार्थ अभिप्राय व्यक्त केला आहे.

लक्ष्मीबाअींचा कल्पनाविलास त्यांच्या लेखनशैलीत यथार्थपणे आविष्कृत झाला आहे. टिळकांच्या विसराळूपणाचे त्यांनी केलेले वर्णन यादृष्टीने पाहण्यासारखे आहे. टिळक क्लासला जायला निघाले की, ` बूट, कोट, मोजे, टोपी, कॉलर, पट्टा, छत्री, वहाणा ही सारी त्यांच्याशी लपंडाव खेळत व त्यांच्याबरोबर आमच्याही साऱ्यांच्या फुगड्या सुरू होत. ` [३९] टिळकांची टोपी सापडेना तेव्हा चिडून त्यांनी खुंटीवरचे सारे कपडे खाली फेकण्यास सुरुवात केली. लक्ष्मीबाअी म्हणतात, ` सर्पयज्ञात सर्पांची वेटोळीच्या वेटोळी येअून अग्निकुंडात पडू लागली तशी आमच्या घरातील कपड्यांच्या चुंबळीच्या चुंबळी भराभर त्या ढिगावर पडू लागल्या. ` सोंगट्यांच्या खेळाचे वर्णनही त्यांच्या कल्पनाविलासाचा अप्रतिम नमुना आहे.

आपल्या आयुष्यातील अनेक प्रकारच्या सुखदु:खात्मक आठवणी लक्ष्मीबाअींनी आत्मीयतेने अुलगडून दाखविल्या आहेत. अेकाचवेळी समरसतेने आणि पुन्हा तटस्थपणाने या आठवणींचे सहजसुंदर कथन त्यांनी केले आहे. आत्मचरित्रा-सारखा साहित्यप्रकार याच तंत्राने यशस्वी होअू शकतो. आपण काहीतरी विशेष स्वरुपाचे सांगत आहोत, अशाप्रकारचा अहंभाव आत्मचरित्र लेखकाच्या मनात जेव्हा निर्माण होतो तेव्हा त्याची भाषा स्वाभाविकतेपासून दूर जाते. आपण अेक साहित्यकृती निर्माण करीत आहोत या जाणीवेने लेखक मग लिहू लागतो. पण लक्ष्मीबाअींच्या मनात याप्रकारची किंचितही जाणीव नाही. ती अेक चार चौघीसारखी प्रापंचिक सुखदु:खात गुरफटलेली पण आपल्या सुखदु:खाकडे काहीशा अंतरावरुन पाहून अंगभूत रसिकतेने आणि विनोदबुध्दीने त्याचे मनमोकळे निवेदन करणारी गृहिणी आहे. म्हणून तर हे आत्मचरित्र कलादृष्टया मराठी मराठीतल्या अन्य आत्मचरित्राहून अनेक अर्थाने लक्षणीय ठरले. याची भाषा साहित्यिक भाषा नाही हेच या आत्मचरित्राचे वाङ्मयीन वैशिष्टय आहे. कारण साहित्य सुध्दा अेक साहित्यकृती म्हणून समोर येण्याअैवजी वाचकाशी सहज संवाद करणारी अेक स्वाभाविक कृती म्हणून जेव्हा पुढे येते तेव्हा ते रसिकप्रिय ठरते.

वास्तविक पाहता लक्ष्मीबाअी या अेक निरक्षर स्त्री. पण या निरक्षर स्त्रीने ` स्मृतिचित्रां ` च्या लेखनाव्दारे अक्षर वाङ्मय निर्माण केले व त्या ` साहित्यलक्ष्मी ` बनल्या. त्यांच्या या वाङ्मयीन कर्तृत्वाचे श्रेय त्यांच्या लेखनशैलीस प्रामुख्याने द्यावे लागेल. अशोक देवदत्त टिळक म्हणतात, ` लक्ष्मीबाअींच्या लेखणीने अेवढे अपार यश मिळवून ठेविलेले आहे की त्यांनी जे लिहावे ते वज्रलेप होअून जावे अशी ` वाचमर्थोनुधावति ` सिध्दि त्यांना प्राप्त झाली आहे.` ४० लक्ष्मीबाअींच्या व्यक्तित्वातील सारे विशेष त्यांच्या लिखाणात अुतरले असल्याने

` स्मृतिचित्रे ` लिहिण्यासाठी त्या स्वत:च जणू लेखणी बनल्या आहेत. लक्ष्मीबाईंच्या भाषाशैलीविषयी गंगाधर गाडगीळ यांचा अभिप्राय मननीय वाटतो. ते म्हणतात की लक्ष्मीबाईंची भाषाशैली हे ` स्मृतिचित्रातल्या अनुभवांचे अेक अविभाज्य अंग आहे आणि म्हणून लक्ष्मीबाईंच्या व्यक्तित्वाची जी वैशिष्ट्ये आहेत तीच त्यांच्या भाषाशैलीचीही आहेत. `[४१] लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्वाचा व लक्ष्मीबाईंनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखांचा अभ्यास करण्यासाठी ` स्मृतिचित्रा ` तील भाषाशैली अुपयुक्त ठरणार आहे. ` स्मृतिचित्रां ` च्या वाङ्मयीन स्वरुपाचा येथवर विचार केल्यानंतर आता त्यातील व्यक्तिचित्रण या महत्वपूर्ण घटकाचा विचार स्वतंत्रपणे करावयाचा आहे.

.....

* * *

वरील चर्चेच्या आधारे आपणास मराठीतील आत्मचरित्रपर लेखन व या लेखनाच्या पार्श्वभूमीवर ` स्मृतिचित्रं ` चे वाङ्मयीन स्वरूप-यासंबंधी महत्वाच्या गोष्टी समजतात. त्या सारांशरूपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील

आंग्लपूर्व काळात मराठीत आत्मचरित्रपर लेखन झाले असले तरी आत्मचरित्र म्हणून लेखन निर्मितीचा प्रयत्न झालेला दिसून येत नाही. आंग्ल काळातच आत्मचरित्र लेखनाची कला विकसित झाली. या कालखंडातील पुरुषांच्या आत्मचरित्रात विशिष्ट कालखंडाचे चित्रण अधिक आढळते. ज्या थोड्या स्त्रियांनी या कालखंडात आत्मचरित्राचे लेखन केले आहे, त्यांनीही आपल्या वैवाहिक जीवनाच्या कौटुंबिक चित्रणावरच अधिक भर दिला आहे. याला अपवाद लक्ष्मीबाअी टिळकांच्या `स्मृतिचित्रं ` चा असून या आत्मचरित्रात लेखिकेच्या बालपणापासून तिच्या मृत्यूपूर्व वार्धक्यापर्यंतच्या दीर्घ कालखंडाचे संपूर्ण चित्रण आढळते. म्हणून हे आत्मचरित्र अुल्लेखनीय ठरते. ` स्मृतिचित्रं ` च्या लेखनामागे पतीची अिच्छा , पुत्राची प्रेरणा व हितचिंतकांचे प्रोत्साहन या गोष्टी कारणीभूत झाल्या असल्या तरी लेखिकेची भूमिका ही जीवनशोध व व्यक्तिशोध घेण्याची राहिली आहे. लक्ष्मीबाअींच्या वैयक्तिक जीवनाखेरीज १८७१ ते १९३६ कालखंडातील महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे समाजदर्शनही या आत्मचरित्रातून घडते. ` स्मृतिचित्रे ` ही केवळ लक्ष्मीबाअींच्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनाची कथा नसून ती अेका सामाजिक जीवनाचीही कथा आहे. ` स्मृतिचित्रं ` त जीवनकथा व व्यक्तिचित्रण या दोन वैशिष्ट्यांबरोबर प्रसंगनिर्मिती, विनोद, तटस्थता, सत्यदर्शन , भावनात्मकता, निरागसता व अकृत्रिम लेखनपद्धती अि. वैशिष्ट्ये आढळत असल्याने या आत्मचरित्राला सामाजिक व वाङ्मयीन मूल्य लाभले आहे.

.....

## संदर्भ - सूचि


१. कुलकर्णी, भीमराव - `नाना फडणिसांचे आत्मचरित्र`
( प्रस्तावना ) महाराष्ट्र साहित्य पत्रिका - अंक २२१,
अेप्रिल - मे - जून १९८२, पृष्ठ-१.

२. देशपांडे, अ.ना. - आधुनिक मराठी वाङ्मयाचा अितिहास
- भाग पहिला - व्हीनस प्रकाशन, पुणे २.
आवृत्ती पहिली १९५४, पृष्ठ ११४.

३. फडके, भालचंद्र - मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन
श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०. पहिली आवृत्ती १९८०, पृष्ठ १४१.

४. तत्रैव, पृष्ठ १४४.

५. देशपांडे, अ.ना. - आधुनिक मराठी वाङ्मयाचा अितिहास.
भाग दुसरा - व्हीनस प्रकाशन पुणे २.
आवृत्ती पहिली १९५८, पृष्ठ ५५६.

६. कर्वे, आनंदीबाअी - माझे पुराण,
केशव भिकाजी ढवळे, मुंबअी ४.
दुसरी आवृत्ती १९५१, पृष्ठ २६.

७. देशपांडे, डॉ. कमलाबाअी - स्मरणसाखळी,
मनोहर ग्रंथमाला प्रकाशन पुणे, (१९४३) पृष्ठ ५६.

८. देशपांडे अुनि, भाग दुसरा, पृष्ठ ५५६.

९. टिळक, लक्ष्मीबाअी - स्मृतिचित्रे- संपादक अशोक देवदत्त टिळक -
नागरिक छापखाना, नाशीक.
`स्मृतिचित्रांचा थोडा पूर्वेतिहास,` अभिनव आवृत्ती, १९७२, पृष्ठ-३.

१०. तत्रैव, परिशिष्ट - ३, पृष्ठ ३६.

११. तत्रैव.

१२. गाडगीळ, गंगाधर - साहित्याचे मानदंड
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६२, पृष्ठ ७३.

१३. टिळक उनि, भाग पहिला, पृष्ठ - ३.

१४. तत्रैव.

१५. तत्रैव, पृष्ठ ९.

१६. तत्रैव.

१७. तत्रैव, पृष्ठ ४३.

१८. तत्रैव, पृष्ठ ४४.

१९. ठिपसे, सौ. प्रतिभा - हृद्गत
दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.
प्रथमावृत्ती १९८१, पृष्ठ १५३.

२०. टिळक उनि, पृष्ठ १६.

२१. तत्रैव, पृष्ठ १५.

२२. तत्रैव, पृष्ठ १६२.

२३. तत्रैव, भाग दुसरा, पृष्ठ ७०.

२४. तत्रैव, पृष्ठ ५३.

२५. गाडगीळ उनि, पृष्ठ ७४.

२६. टिळक उनि, भाग पहिला, पृष्ठ ६२.

२७. तत्रैव, पृष्ठ ८१.

२८. तत्रैव, भाग तिसरा, पृष्ठ १५१-५२.

२९. फडके, ना.सी. - प्रतिभा-साधन,
देशमुख आणि कंपनी, पुणे-२.
दहावी आवृत्ती १९७०, पृष्ठ २३२.

३०. टिळक अुनि, भाग पहिला, पृष्ठ १६.

३१. तत्रैव, पृष्ठ ४४.

३२. तत्रैव, पृष्ठ ४५.

३३. तत्रैव , भाग दुसरा, पृष्ठ ६७.

३४. तत्रैव, पृष्ठ ६८.

३५. तत्रैव, भाग चौथा, पृष्ठ १.

३६. तत्रैव, पृष्ठ १०.

३७. टिळक , लक्ष्मीबाअी - स्मृतिचित्रे (संक्षिप्त)
संपादक देवदत्त नारायण टिळक ,
साहित्य क अकादेमी तर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबअी.
दुसरी आवृत्ती १९६८, प्रस्तावना, पान १५.

३८. गाडगीळ अुनि, पृष्ठ ८८.

३९. टिळक अुनि, अभिनव आवृत्ती, भाग तिसरा, पृष्ठ ३७.

४०. तत्रैव, प्रस्तावना, पृष्ठ ३.

४१. गाडगीळ अुनि, पृष्ठ ८६.

.....